


# बोर्टेझोमीब इंजेक्शन
# Bortezomib Injection



## बोर्टेझोमीब इंजेक्शन बद्दल सूचना आणि महत्वाची माहिती

- बोर्टेझोमीब हे इंजेक्शन मल्टिपल मायलोमा ( रक्तातील प्लाझ्मा पेशींचा कर्करोग ) असलेल्या रुग्णांच्या उपचारासाठी आहे.
- हे औषध रक्ताचे आजार व कर्करोगावर उपचार करण्यात अनुभवी डॉक्टरांनी लिहून दिले जाते.
- बोर्टेझोमीब हे इंजेक्शन हेल्थकेअर प्रोफेशनल म्हणजे डॉक्टर किंवा नर्स द्वारे आपल्या शिरामध्ये इंजेक्शन म्हणून ( INTRAVENOUS किंवा आयव्ही ) किंवा आपल्या त्वचेच्या खाली (त्वचेखालील किंवा SUBCUTANEOUS) देऊ शकतात.
- Reconstitution - इंजेक्शन योग्य, स्वच्छ आणि निर्जंतुक पद्धतीने हाताळावे. पुनर्रचने साठी फक्त ०.9% सोडियम क्लोराईड ( 0.9% Normal saline ) चा वापर करावा. इंजेक्शन स्पष्ट आणि रंगहीन असावे.
- नसेतून IV पुश देताना – (Final concentration - 1 mg/ml) - 3 ते 5 सेकंद बोलस इंजेक्शन म्हणून दिले जाते. Direct slow IV push – 2 ml / 2.5 ml / 3.5 ml injection
- त्वचेखालील किंवा SUBCUTANEOUS देताना- (Final concentration 2.5 mg/ml) – 2 mg in 0.8 ml / 2.5 mg in 1 ml / 3.5 mg in 1.4 ml इन्सुलिन सिरींजने द्यावे.
- नसांवर दुष्परिणाम (Peripheral neuropathy ) होवू नये म्हणून बॉर्टेझोमीब त्वचेखाली देणे जास्त फायद्याचे आहे. जरी इंजेक्शन वर फक्त IV वापरा साठी असेच लिहलेले असले तरी आपण ते त्वचेखाली देवू शकतो.
- किती वेळा बोर्टेझोमीब घ्यावे ? – प्रत्येक पेशंटचा औषधोपचार प्लान वेगळा असतो, त्या मुळे दिलेल्या इंजेक्शन तारखेलाच घ्यावे. बहुतेकदा हे दर आठवड्याला एकदा असते.
- कधी देवू नये - जर आपल्याला बॉर्टेझोमीब, बोरॉन किंवा मॅनिटॉलची अलर्जी असेल तर आपण हे घेऊ नये. हाता-पायांना मुंग्या येणे किंवा आग होणे, प्लेटलेटस ३०,००० हून कमी असणे.
- किडनी आजार असल्यास - आपण जर डायलिसिसवर असाल तर, बोर्टेझोमीब डायलिसिस प्रक्रियेनंतर लावावे.
- बॉर्टेझोमीब चे दुष्परिणाम – काही व्यक्तींना -पॅरीफेरल न्यूरोपॅथी, थकवा, मळमळ, अतिसार, अशक्तपणा, उलट्या, रक्त पेशींचे कमी होणे, अंगावर पुरळ येणे, भूक कमी होणे हे दुष्परिणाम दिसू शकतात.
- आमच्याशी संपर्क कधी करावा – जर जास्त उलट्या किंवा संडास झाल्यास, ताप आल्यावर आणि रक्त पेशी कमी झाल्यास.

**डॉ. मनोज तोष्णीवाल**
- रक्तविकार तज्ञ व बोनमॅरो तज्ञ


**JEEVAN AMRUT HAEMATOLOGY CENTER**

Plot No. 312-313, Beside Kala Ganapati Mandir,
N-1 CIDCO, C-Sector, Chh. Sambhajinagar, India.

9907 104 104 | (0240) 2481104

**जीवन अमृत हेमॅटोलॉजी सेंटर**

प्लॉट क्र. ३१२-३१३, काळा गणपती मंदिराशेजारी,
एन-१ सिडको, सी-सेक्टर, छ. संभाजीनगर, इंडिया.

९९०७१०४१०४ | (०२४०) २४८११०४

www.jeevanamrut.co.in